महाराष्ट्र शासन

# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महा व रुग्णालय,अंबाजोगाई

SWAMI RAMANAND TEERTH RURAL GOVT MEDICAL COLLEGE, AMBAJOGAI DIST BEED
PH NO (02446)245792/248963/249362/248438/ Website www.srtrmca.org email-srtrgmc@gmail.com

जा.क्र.स्वारातीग्राशावैमअं/सामान्य भांडार/ 2428 /२०२५ दिनांक - २४/०६/२०२५

आदेश

**विषय** : महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालयात विमा माध्यमातून जमा होणा-या निधीचा विनियोग करणेवावत समितीचे गठण

**संदर्भ** : या कार्यालयाचे आदेश क्र.जा.क्र.स्वारातीग्राशावैमअं/सामान्य भांडार/६१०७/२०२५, दि.११.६.२०२५

उपरोक्त विषयांकित प्रकरणी, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत विभागाच्या नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय/दंत महाविद्यालय व संलग्नीत रुग्णालयात विमा माध्यमातून जमा होणा-या निधीचा विनियोग करणेवावत तसेच उक्त निधीचे अनुषंगाने संस्थेत करण्यात येणारी कामे व त्याची प्राथमिकता, प्राध्यान्यता, निकड इत्यादी बाबत बैठकीत चर्चा करुन ठरविण्यात यावीत. सदर बैठकीत संबंधीत समिती याविषयी उपलब्ध निधीतून करण्यात आलेल्या कामांचा नियमितपणे आढावा घेईल. संबंधीत विभागप्रमुख यांच्या विभागांतर्गत या निधीतून करण्यात येणाऱ्या/आलेल्या कामांचा प्रगती अहवाल/माहिती बैठकीत सादर करतील. बैठकीचे सदस्य-सचिव सदर माहितीचे संकलन करुन याविषयी करण्यात येणारा खर्च केवळ शासनाने मान्यता दिलेल्या बाबींवरच विहीत कार्यपध्दतीनुसार, शासनाने वेळोवेळी विहीत/प्रदान केलेल्या आर्थिक मर्यादेतच करण्यात येईल या तत्वाचे सदर समिती कटाक्षाने पालन करील. सदरील समितीने प्रत्येक महिन्यात किमान एक बैठकीचे आयोजन करुन त्याबावतचे इतिवृत्त व इतर माहिती/ दस्तावेज जतन करुन ठेवावा. याकरीता संदर्भिय आदेशान्वये समितीचे गठण करण्यात आलेले होते.परंतु सदरील आदेश या आदेशान्वये रद्द करण्यात येत असून दिनांक १५ मार्च २०२३ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार खालील प्रमाणे पुन:श्च समितीचे गठण करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | समितीतील पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ.शं.सं.धपाटे,अधिष्ठाता | अध्यक्ष |
| २ | डॉ.सि.वि.बिराजदार,प्राध्यापक व विभागप्रमुख,औषधवैद्यकशास्त्र | सदस्य |
| ३ | डॉ.नि.ना.चाटे,प्राध्यापक व विभागप्रमुख,शल्यचिकीत्साशास्त्र | सदस्य |
| ४ | डॉ.रा.रा.जाधव,वैद्यकीय अधिक्षक | सदस्य |
| ५ | श्री.दामोदर भोसले,प्रशासकीय अधिकारी रुग्णालय विभाग | सदस्य-सचिव |
| ६ | उपविभागीय अभियंता,सा.बां.वि.मे.प.अंबाजोगाई | सदस्य |

(डॉ.शं.सं.धपाटे)
अधिष्ठाता,
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय
वैद्यकीय महा व रुग्णालय, अंबाजोगाई

प्रति,
उपरोक्त सर्व संबंधीत,स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म.अंबाजोगाई